
# श्रद्धेय सीतारामअप्पा बाबारामअप्पा एकलारे स्मृतिग्रंथ




Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani



# आधारवड

श्रद्धेय सीतारामअप्पा बाबारामअप्पा
एकलारे स्मृतिग्रंथ

प्रथम आवृत्ती : २५/०८/२०२२
ISBN 978-93-82995-67-8
© : Shri. Pramod Sitarampappa Eklare

* संपादक
श्री संतोष आप्पाराव एकलारे

* संपादक मंडळ
श्री अमृतराज भुजंगराव कदम
श्री गोविंदराव साहेबराव कदम
श्री प्रमोद सीतारामअप्पा एकलारे

* कार्यकारी संपादक
डॉ. रवि धोंडीराज बरडे

* मार्गदर्शक
श्री गुरू डॉ. नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज
श्री उत्तमराव दाजीसाहेब कदम
डॉ. दत्तात्रय रामचंद्र वाघमारे
श्री साहेबराव मारोतराव कदम
श्री श्रीनिवास रामनाथ काबरा
मा. प्राचार्य मनोहर माधवराव सोनटक्के
डॉ. विनय दत्तात्रय वाघमारे
श्री सुर्यकांत उत्तमराव कदम
श्री नितिन श्रीनिवास काबरा
प्राचार्य डॉ. के. राजकुमार

* संपादन सहाय्य
डॉ. शिवसांब कापसे
श्री अरूण डुब्बेवार
श्री गिरीष डावरे
डॉ. सोमनाथ गुंजकर

* प्रकाशक
अनुराधा पब्लीकेशन्स,
सिडको, नांदेड

* मुद्रक
बालाजी ग्राफिक्स, परभणी
मो. ७०५८२४०६००

३०. **साधी राहणी उच्च विचार**

– डॉ. संतोष बाबुराव कुऱ्हे / ५३

३१. **सीतारामअप्पा एकलारे दानशूरतेचा कळस ...**

– प्रा. ई.आर. मठवाले / ५४

३२. **अविस्मरणीय अण्णा**

– प्रा. ब.सु.कानडे / ६०

३३. **मी पाहिलेला देवमाणूस**

– डॉ. भुताळे पि.व्ही. / ६१

३४. **मी अनुभवलेले अण्णा ...**

– श्री अरूण डुब्बेवार / ६६

३५. **श्री गुरू बुद्धिस्वामी परिवाराचा आधारस्तंभ कोसळला ...**

– डॉ. आदिनाथ इंगोले / ६७

३६. **मनाची श्रीमंती असणारे अण्णा ...**

– श्री बाळासाहेब कुलकर्णी / ६८

३७. **सर्वस्पर्शी समाजसेवेचा शिलेदार**

– डॉ. संतोष शिवराज चांडोळे / ७०

३८. **प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व**

– डॉ. शिवसांब कापसे / ७२

३९. **उत्तुंग व्यक्तिमत्वाचा सहवास**

– डॉ. सोमनाथ गुंजकर / ७३

४०. **सर्वांगिण विकासाचे महामेरू – अण्णा**

– डॉ. पुष्पा गंगासागर / ७६

४१. **येथे कर माझे जुळती ...**

– डॉ. संजय दळवी / ७७

४२. **माझ्या नजरेतील कर्मयोगी**

– डॉ. रवी बरडे / ७९

४३. **अप्पा आपण होतात ...**

– अश्विनी पांचाळ / ८३

४४. **विद्यार्थ्यांचे उर्जास्त्रोत अप्पा**

– नितीन स[illegible]



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Sanstha's
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.)
Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

# सर्वांगिण विकासाचे महामेरू – अण्णा

प्रा. डॉ. पुष्पा गंगासागर

वनस्पतीशास्त्र विभाग, श्री गुरु बुद्धिस्वामी महाविद्यालय, पूर्णा

श्रध्देय सीतारामअप्पा एकलारे (अण्णा) यांचे नांव घेतले की त्यांचा चेहरा समोर येतो आणि महाविद्यालयातील ते दिवस आठवतात जे आम्ही प्रत्यक्ष अनुभवले. अण्णाचें स्त्री शिक्षणाविषयीचे विचार महात्मा फुले यांच्या विचारधारेवर आधारलेले होते. जसे महात्मा फुलेनी पुण्यात मुलींसाठी शाळा स्थापन केली त्याचप्रमाणे अण्णानी पूर्णेसारख्या ठिकाणी गोरगरीबांच्या पाल्यांसाठी त्यांच्या विचारधारा पटणाऱ्या सहकाऱ्यांसोबत मिळून शाळा व महाविद्यालय स्थापन केले. त्यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे. अशा महान उत्तुंग व्यक्तिमत्वाच्या कार्याचा आढावा म्हणून माझा हा छोटासा प्रपंच आहे.

श्रध्देय सीतारामअप्पा एकलारे म्हणजेच शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक उन्नतीच्या विकासाचे महामेरुच होते. त्यांच्या मनावर थोर राष्ट्रपुरुष व राष्ट्रभक्तांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांच्या विचाराच्या प्रेरणेतूनच त्यांनी पूर्णासारख्या ग्रामीण भागात उच्च शिक्षणाची गंगा वहावी म्हणून श्री गुरु बुद्धिस्वामी महाविद्यालय सुरु केले. त्यांचे व्यक्तिमत्व बहुआयामी व अष्टपैलू असेच होते. दुरदृष्टी व दुर्दम्य इच्छाशक्ती हे त्यांचे प्रबळ गुणवैशिष्ट्ये होते. इतराप्रती असलेला आदरभाव, सहकार्याची भूमिका त्यांच्या कार्यातून मला पदोपदी जाणवली आहे.

प्रसंग कोणताही असो एखादा पालक-विद्यार्थी आर्थिक अडचणीत असेल तर ते सर्वप्रथम मदतीचा हात पुढे करत व त्यांच्या मनामध्ये शिक्षणाविषयी आत्मविश्वास निर्माण करत असत. शिक्षण प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांना मध्यवर्ती ठेवून त्यांच्या भोवती सर्व शिक्षण व्यवस्था नियोजीत केली जावी हाच त्यांचा अट्टाहास नेहमी असायचा. विद्यार्थ्यांना ज्ञान मिळावे, त्यांचे अध्ययन सखोल व्हावे, त्यांचे व्यक्तिमत्व विकसित व्हावे, तो एक आदर्श नागरिक बनावा, त्याने कुटुंबाच्या काळजीप्रमाणेच समाजसेवा, देशसेवा करावी अशी त्यांची हृदय कळकळीची धडपड होती.

शैक्षणिक संस्था, क्रिडांगणे, वृक्ष जैवविविधत्ता अधिक सक्षम व अद्यावत करण्यावर त्यांनी भर दिला व अगदी कमी काळात इवल्याशा रोपट्याचें प्रचंड वटवृक्ष साकारण्यात त्यांच्या कृतीची जाणीव मला सतत येते.

श्रध्देय सीतारामअप्पा एकलारे बहुश्रुतपणाचा गुण अधिक स्पष्टपणे लक्षात येतो. महाविद्यालय परिसरात कुठलीही समस्या असेल तर व्यवस्थीतपणे ऐकून त्यावर क्षणाचाही विलंब न करता पटकन त्या प्रश्नांची उकल करत असत व पालक, विद्यार्थी, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या शंका समाधान करत असत.

अण्णा प्रत्येक सांस्कृतिक कार्यक्रमात हजर असायचे. त्यांचा अध्यक्षीय समारोप म्हणजे विद्यार्थ्यांसाठी प्रचंड प्रेरणादायी विचारांचा स्रोतच असायचा. त्यांच्या कार्याची महती ही न संपणारी अशीच आहे....



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)